# चुलीपल्याड...

अंक ३ रा - मार्च २०१२

**तिसऱ्या अंकाच्या निमित्ताने...**

संवादिनी प्रकल्पाला तीन वर्षे पूर्ण होतानाच चुलीपल्याडचा तिसरा अंकही निघतो आहे आणि तोही बारा पानांचा. मागच्या वर्षी चुलीपल्याड काढायचे ठरविले तेव्हा बायका खरंच लिहितील का अशी मनात धाकधूक होती. मात्र संधी आणि थोडे मार्गदर्शन मिळाले तर बायका संधीचे सोने करतात हे सिद्धच झाले आहे.

या तीन अंकांमध्ये काम करताना लक्षात आले की बायका स्वतःचे वैयक्तिक अनुभव मोकळेपणाने मांडतात. स्वतःच्या मनातले विचार मांडण्याची संधी पहिल्यांदाच मिळाल्याने स्वतःबद्दल सांगणे हे जास्त सोपेही वाटत असेल. ते चांगलेच व महत्त्वाचेही आहे. पण आता आपल्याला हळू हळू पुढे जायला हवे. एखाद्या प्रश्नाचा अभ्यास करणे, प्रश्न नेमकेपणाने मांडता येणे आवश्यक आहे. यासाठी संस्था, कार्यकर्ते आणि आपल्या सगळ्यांनाच अजून खूप प्रयत्न आणि मेहनत करावी लागणार आहे.

दुसऱ्या अंकाच्या वेळेस जागा नाही म्हणून काही लेख अंकात घेता आले नाहीत. त्यामुळे संपादक मंडळामध्ये अंकाची पाने वाढवावी याबाबत चर्चा झाली. चुलीपल्याडच्या मूळच्या आकारात एकदम चार पाने वाढवणे शक्य नसल्याने पानाचा आकार कमी करून पाने वाढवायचे ठरले. म्हणूनच यावेळच्या अंकाच्या आकारात व पानांच्या संख्येत बदल झाला आहे.

चुलीपल्याड अंकासाठी लेख, विनोद , गाणी लिहिल्याबद्दल, चित्र काढल्याबद्दल सर्वजणींचे मनापासून आभार.

संपादक मंडळ : अपर्णा कुलकर्णी, विशाल काळोखे, शेहेनाज शेख, अनिता गोरे, रोहिणी दीक्षित, शोभा नायडू, मेधा टेंगशे, उमेश भाग्यवंत, वैशाली गायकवाड, वृंदा वझे

टंकलेखन : संध्या गवळी

आतली चित्रे : रोहिणी दीक्षित (एफ पी ए आय), संगीता जाधव (साधना व्हिलेज), आम्रपाली सावंत, मीना कदम व सुनिता कांबळे (स्त्रीवाणी), श्रीलिपी क्लिप आर्ट, जागोरी डायरी २००५, 'सन्मानाने जगण्यासाठी' (मासूम प्रकाशन),

प्रकाशक : आलोचना, ५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला, ५५/ १४-१५-१६, अशोक पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४. फोन : ०२०-२४४४१२२

फक्त खासगी वितरणासाठी

या अंकातील विचारांशी संस्था सहमत असेलच असे नाही.

# स्थलांतर...

स्थलांतर म्हणजे सोप्या भाषेत आपण जेथे स्थायिक आहोत ते गाव, ती वस्ती किंवा शहर सोडून कायमचे किंवा काही काळासाठी दुसरीकडे जाणे. काही वेळेस इच्छेने किंवा परिस्थितीमुळे स्थलांतर करावे लागते. अनेकदा ते विकासाच्या नावावर लादले जाते. त्यामुळे स्थलांतरात चांगले-वाईट असे दोन्ही प्रकारचे अनुभव दिसतात.

धरण असो, रस्त्याची कामे किंवा झोपडपट्टी पुनर्वसन असो, विकासाच्या नावाखाली लादले गेलेल्या स्थलांतरामुळे लोकांना अनेक गंभीर अडचणींना तोंड द्यावे लागते. हा फक्त जागा बदलण्याचा प्रश्न नाही. वर्षानुवर्षांची नाती विस्कटतात, जगण्याची पद्धती बदलते. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नावाखाली नेमका कोणाचा विकास आहे ह्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. काही वेळेस 'जगण्यासाठी' स्थलांतरे करावी लागतात. शहरात कामाची उपलब्धता आहे. गावापेक्षा काही चांगल्या सुविधा मिळतील म्हणून लोक शहरात येतात. मात्र काही दिवसात शहरात फायद्यांप्रमाणेच तोटेही जाणवायला लागतात. पण एकदा विशिष्ट जीवनसरणीची सवय लागली की गावाकडे परतणे अवघड असते. अनेकदा परत जायचे मार्गही खुंटलेले असतात.

स्त्रियांच्या आयुष्यात विवाहामुळे होणारे स्थलांतर याबाबत स्त्रियांचे बोलके अनुभवही या अंकात वाचायला मिळतील.

## वायदे केले मोठे, पण...

५० वर्षापासून आम्ही नगर रोडवर रामवाडी येथे राहत होतो. एक दिवस अचानक आम्हाला कळवले की तुमची घरं मोडून येथे रस्ता बनवण्याचे काम सुरू होणार आहे. तेव्हा खूप वाईट वाटले. त्यात एक दिलासा मिळाला की घर मोडलं तरी घराच्या बदली घर मिळणार होते. बिल्डरने सांगितले तुम्हांला पाच-सहा मजली मोठ्या इमारतीत घर मिळणार आहे. जा-ये करण्यासाठी लिफ्ट बसवणार आहेत. आमची इच्छा नसतानाही घरं मोडण्यात आली. नव्या जागेबाबत मनात खूप शंका होत्या. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुलांची शाळा कुठे असेल? जवळ की लांब? शेजार कसा असेल? इथे वस्तीत घरासमोर जागा होती व जवळच किराणा दुकान होते. रॉकेल असो-नसो लाकडे विकत आणून चुलीवर स्वयंपाक करण्याची जागा होती.

अशा सर्व शंका-आशंका घेऊन आम्ही कोरेगाव पार्कपाशी राहण्यास गेलो. आजूबाजूला मदारी(सापाचे खेळ दाखवणारे) लोकांची वस्ती होती. मग लक्षात आले की तेथे ना लिफ्टची सोय, ना पाण्याची सोय. शाळा तर खूपच लांब. मुलांना शाळेत पाठवायचे म्हणजे दोन हायवे रोड ओलांडून व दोन रेल्वे रूळ ओलांडून अगदी जीव मुठीत घेऊन पाठवावे लागे. काही काहींनी तर मुलांना घरीच बसवले. शेजारच्या वस्तीमध्ये तर रोजच भांडणे-मारामारी. तरूण मुलींना तर बाहेर निघणेही कठीण. आम्हांला तेव्हा कळून राहिले की आमची फसवणूक झाली.

शौचालय प्रत्येकाला आहे परंतु त्याचा वापर करायचा तर पाणी पाहिजे. पाणी आणायचे म्हणजे पाच मजली इमारत खाली उतरून वस्तीमध्ये पाण्याला जावे लागते. वस्तीवाले नळाचे मालक त्यामुळं त्यांचे सर्व पाणी भरून झाल्यावर मग आम्हांला पाणी. ते लोक तांदुळ, भाजी धुवायलाही नळाखाली. मग आम्ही कितीही वेळ तेथे उभे राहिलो तरी चालेल. हे आताही सुरूच आहे. जर जास्त काही बोललो तर भांडण. मग भांडण नको म्हणून आम्ही मध्यरात्री पाणी भरतो. जणू पाण्याला सोन्याची किंमत आली आहे.

आम्ही सर्व तक्रारी घेऊन मनपाच्या कार्यालयात कितीतरी वेळा गेलो. परंतु काही उपयोग झाला नाही. आम्हांला

सांगितले एक आणि केले मात्र दुसरेच. आमचे रेशनकार्ड मात्र रामवाडी नाक्याचे आहे पण आता रेशन कार्डावर काहीच भेटत नाही. फक्त एक रहिवासी पुरावा एवढाच त्याचा उपयोग. ह्या सर्व गोष्टीला कंटाळून काही लोक हे घर भाड्याने देऊन दुसऱ्या ठिकाणी राहायला गेले. परंतु सर्वांची परिस्थिती एक सारखी नसते. आम्ही आजही तेथेच आहोत.

आम्हांला तेथे राहायला जाऊन पाच ते सहा वर्ष झाली आहेत. परंतु आजही ती जागा आमच्या नावावर नाही. घरात वीज नव्हती. आम्हीच आमचा विचार करून आता मीटर घरात घेतला आहे. जेव्हा आम्ही घर आमच्या नावावर करा अशी मागणी केली तेव्हा ते म्हणाले, 'टॅक्स भरा सर्वांनी.' पण असे तर घर मोडताना ठरवले नव्हते. आणि एवढे एकदम पाच सहा वर्षाचे टॅक्स आम्ही कसे भरणार? एक तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आम्ही राहायला गेल्याने आमचा रोजगार गेला. दुसरे काम शोधावे लागले. काहींची वस्तीत छोटी-मोठी दुकानं होती. ती दुकानही मोडली.दुकानाच्या बदली जागाही नाही दिली.

आम्ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालो परंतु आमची फसवणूक करून घेतली. आम्हाला वायदे मोठे केले परंतु ते पार पाडले गेले नाही.

**शब्दांकन - शेहनाज शेख, स्त्रीवाणी.**

---

# कशासाठी? पोटासाठी

स्थलांतराचा उद्देश स्वत:चा किंवा कुटुंबाचा विकास करणे हा असू शकतो. पण काही भागात याचा वास्तविक परिणाम हा वेगळ्या स्वरूपाचा होत असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. यातील एक म्हणजे खेड आणि चाकण परिसरातील ग्रामीण आणि दुर्गम भागात एम.आय.डी.सी (औद्योगिक वसाहत) मधील मिळणारा सहज रोजगार आणि काम यासाठी झालेले स्थलांतर

खेड मधील कोरेगाव परिसरातील बहुतांशी तरुणांनी त्यांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे शेती आणि त्याचे जोड धंदे हे कायमचे बंद केले आहे. मासिक तत्त्वांवर मिळणाऱ्या पैशांसाठी घरदार, शेतीवाडी सोडून एम. आय.डी.सी परिसरात भाड्याचे घर घेऊन राहणे पसंत केले आहे. जे गाव सोडून राहिले आहेत त्यांना त्वरित पैसा मिळत आहे. त्याशिवाय आधुनिक सोयी सुविधाही. त्यामुळे त्यांच्या मते ते स्वत:ची प्रगती करीत आहेत. मात्र गावी ज्या म्हाताऱ्या माणसांना सोडून आले त्यांचे काय?

आपले पारंपरिक व्यवसाय दिवसेंदिवस संपुष्टात येत आहेत. मागे राहिलेल्या वृद्धांची अवस्था ही दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. त्यांना लागणाऱ्या दैनंदिन गरजांसाठी देखील झगडावे लागत आहे. शेतीच्या ओसाडाचे आणि पडिकाचे प्रमाणही वाढत आहे. गावात शिल्लक राहिलेल्या वृद्ध व्यक्ती शेती करू शकत नाहीत आणि त्यांना शेती करुन घेण्यासाठी पुरेशी माणसं देखील मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची अक्षरश: कोंडी झाली आहे.

**ॲड. विशाल काळोखे**
**प्रकल्प समन्वयक, दिशा**





# मुलगी वयात येताना

*वयात येणे हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा. आयुष्याच्या या वळणावर आईची जबाबदारी वाढते. मुलीबद्दल वाटणारी काळजी, माया, तिच्या भविष्याबाबत मनातील हुरहुर या लेखांमधून व्यक्त होते.*

---

आपल्या वयात आलेल्या मुलीचा सांभाळ म्हणजे जणू आईची एक अग्निपरीक्षाच असते. आपल्या मुलीला वयात आल्यावर होणारे शारीरिक व मानसिक त्रास यांचीही काळजी आईला घ्यावी लागते. मुलीच्या आयुष्यात कुठलीही संकटे आली तरी आईलाच सामोरे जावे लागते. - **सुवर्णा लोखंडे, वडगाव, दिशा**

## कळी उमलताना...

माझी सोनू सातवीला गेली आणि मनात चर्रर... झाले. माझी मुलगी कदाचित याच वर्षी वयात येईल, माझ्यासारखी शाळेतच हिची फजिती झाली तर?.... पण शाळेनेच माझी ही समस्या सोडवली. खास सातवीतील मुलींची मिटींग घेऊन त्यांना सर्व गोष्टी सविस्तर सांगितल्या. त्यामुळे माझे दडपणच गेले. नाहीतर हे सर्व मी तिला कसे सांगितले असते?

एक दिवस सोनूनच सांगितले की ती वयात आली म्हणून. किती सहजपणे तिने स्वीकारलं. दिवस गेले तर ती गोष्ट आपण किती आनंदाने सांगतो. पण त्याची पहिली पायरी स्त्रीत्व येणे आपण साजरे का करत नाही? मग मीच ठरविले. माझी वहिनी, बहीण, तिची आत्या सर्वांना संध्याकाळी बोलावले. मस्त तिच्या आवडीच्या रंगाचा ड्रेस आणला. तिच्या आवडीचेच जेवण बनविले. आजूबाजूच्या माझ्या मैत्रिणींना बोलावले. सोनू शाळेतून आल्यावर तिला सजवले. पाचजणींनी फळांनी तिची ओटी भरली, औक्षण केले. गाणी लावून धमाल केली.

खरच स्त्री होणे हे आनंददायी आहे हे मला का अनुभवता आले नाही? इतकी वर्षे मी माझ्यातल्या स्त्री होण्यावर चिडत राहिले! ते नकोसे चार दिवस, मुलगी म्हणून मिळालेले दुय्यम स्थान. कदाचित यामुळेच मी माझाच राग राग करीत राहिले. सोनूच्या बाबतीत मी असे होऊ देणार नाही. ती नाही कोणी मोठी झाली तरी एक स्त्री म्हणून तिला स्वत:चा अभिमान वाटला पाहिजे.

**वसुधा काळभोर, एफ पी ए आय**



### मुलगी वयात येताना मुलीचे विचार

मुलगी वयात येताना आई तिची पूर्वीपेक्षा जास्त काळजी घेते. तिच्यावर लक्ष ठेवते. ती कुठे जाते, तिच्या मैत्रिणी कोण-कुठल्या, कशा आहेत याची ती सारखी चौकशी करते. हे सर्व करत असताना तिला आपल्या मुलीची काळजी वाटत असते.

मुलगी वयात आली की तिला नेहमी इकडे नको जाऊ, हे नको करू, याच्याशी नको बोलू असे सांगत असते. मात्र मुलींना ते सर्व नको असते.

**मयूरी देशकर, इ.१२वी, वारजे माळवाडी, एफ पी ए आय**

# मी आईही मैत्रीणही

मला कळत नसतानीच माझे लग्न झाले. निसर्गाच्या नियमाने तीन मुली व एका मुलाची आई झाले. बघता बघता सर्व मुले मोठी होत होती. माझ्या मुली वयात येत होत्या आणि मला त्यांची काळजी वाटत होती. कारण आमचा विटकारखाना (वीटभट्टी) आहे. दिवसभर काम करावे लागते. विचार केला मुलींना भट्टीवर घेऊन जावे पण तेही जमत नव्हते. मग मी निर्णय घेतला मी भट्टीवर जाणार पण माझ्या मुलींना वाढत्या वयाची जाणीव व समज देत राहणार. वेळोवेळी त्यांची मैत्रीण होऊन त्यांच्या बरोबर गप्पा मारणार.

आज मला खूप आनंद वाटतो की माझ्या तीनही मुली चांगलं शिक्षण घेत आहेत. त्यांना सर्व प्रकारची शारीरिक माहिती झालेली आहे. जेणेकरून त्यासुद्धा जीवनामध्ये सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करतील.

**लक्ष्मी कुंभार,कामशेत, दिशा**



***मायलेकीची भांडणं जशी दुधावरची उकळी***
***लेक मनाची मोकळी आई श्रावणसाखळी***

**संकलन - शांताबाई व पुतळाबाई फाले, चिखलगाव, साधना व्हिलेज**

# माय-लेक

*समाजाने ठरवलेल्या चौकटीत न बसणाऱ्या व्यक्तीला समाजात किती त्रास होतो हे आपण पाहतोच. अशी मुलगी असेल तर आईची काळजी जास्तच वाढते. मग अनेकदा आया घरातच अडकून जातात. तर काहीजणी त्यातूनही मार्ग काढतात. मुलीला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सज्ज होतात. अशाच एका आईचे हे मनोगत.*

माझी मुलगी अभ्यासात खूप मंद आहे. लहानपणी ती आईकडे होती पण वयात आल्यावर मात्र मी तिला घरी आणलं. ती घरीच असते. मी तिला मोठ्या माणसांशी कसं वागायचं, कसं बोलायचे हे शिकवले. घरातली कामे धुणं भांडी, पाणी, स्वयंपाक शिकवला. शिलाईकाम शिकवले. शेतात काम करायला शिकवले. मी जर बाहेर गेले तर बाहेर जाऊ नकोस असे सांगते.

तिची पाळी सुरू झाल्याने तिची काळजी वाटते. पाळी आल्यावर कसे वागायचे हे तिला आधीच समजावून सांगितले. पण मी घराबाहेर कुठे गेले की माझं लक्ष घरीच असते. मुलगी बाहेर गेली तर घरात माझे लक्ष लागत नाही.

**रखमा कालेकर, हाडशी, साधना व्हिलेज**

---

***लेकीची जात हरभऱ्याची डाळ***
***जाईन परघरी, मग हुईल तिची राळ***

(राळ म्हणजे तीला सासुरवास होईल.)

***लेकीची जात सोनीयाची छत्री***
***जाईन परघरी उभी राहील कोपयरी!***

(छत्री सोन्याची असली तरी शेवटी तिची जागा कोपऱ्यातच. सासरी गेलेल्या लेकीची परिस्थितीही तशीच होते.)

**संकलन - यमुनाबाई धिडे, कोळवण, साधना व्हिलेज**

# बाळंतपणातील आहार

*गाव असो वा शहर, बाळंतबाईच्या आहाराकडे सगळे नेहमीच लक्ष देतात. उपलब्धतेनुसार व तेथील स्थानिक समजुतींनुसार आहारमध्ये फरक होतो. मात्र सगळीकडे बाळंतबाईची तब्येत सुधारणे व बाळासाठी भरपूर दूध उपलब्ध होणे हाच मुख्य उद्देश. बाळंतिणीच्या आहाराविषयी असणाऱ्या विविध समजुती आणि काही पाककृती इथे देत आहोत. आमच्याकडे या विषयावर खूप पाककृती आल्या. त्यामधून कमी खर्चिक असलेल्या व नेहमीपेक्षा वेगळ्या असलेल्या पदार्थांची निवड करण्यात आली आहे.*

### मेथीच्या काड्यांचा काढा

मेथीच्या काड्या वेगळ्या करणे व काड्या पाण्यात उकळून घेणे व त्यांचे पाणी काढून बाळंतिणीला प्यायला देणे. यामुळे हाडे मजबूत राहण्यासाठी व हाडांची झीज भरून येण्यासाठी मदत होते.

### कर्नाटकमधील पदार्थ - हरीरा

प्रथम रवा तुपात लालसर भाजून घेणे. दूध किंवा पाणी उकळून घेणे. उकळल्यावर त्यात रवा टाकून चांगले हलवून घेणे. मग गूळ टाकणे. बडीशेप वाटून टाकणे. हे पेय रोज सकाळी बाळंतबाईला अंघोळ झाल्यावर देणे. बडीशेप टाकल्याने आईने काहीही खाल्ले तरी बाळाला त्याचा त्रास होत नाही. तूप, गुळाने बाळंतबाईला ताकद येते.



**जैतुनबी शेख, मांजरी, स्त्रीवाणी.**

### खसखसची आमटी

खसखस कोरडी लालसर भाजून घेणे. त्यात खोबरे, लसूण, आले, एखादी मिरची वाटून घालणे. त्यात चवीप्रमाणे मीठ घालून फोडणी देणे. मग पाणी घालून उकळी आणणे. ही आमटी भाताबरोबर किंवा त्यात भाकरी कुस्करून खाता येते. खसखशीमुळे गर्भाशयाचा आकार पूर्ववत होण्यास मदत होते.

**मोहिनी गव्हाणे, वडगाव मावळ, दिशा**

### भोई लोकांमधील पध्दत

खेकड्यांच्या नांग्यांचा रस्सा तयार करणे व तो रस्सा भाताबरोबर खायला देणे. यामुळे कंबर दुखत नाही.

सुक्या बोंबिलाचे लहान लहान तुकडे करणे व ज्वारीच्या पिठाने ते तुकडे धुणे व त्यांची भाजी करून ज्वारीच्या भाकरीबरोबर खायला देणे. बाळंत बाईला दूध येण्यासाठी उपयोगी आहे.

**-प्रमिला गायकवाड, रामवाडी, स्त्रीवाणी.**

### बाजरीची कंजी

बाजरीचे पीठ लाल होईपर्यंत तुपात भाजून घेणे. इलायची टाकून पाण्याला उकळी येऊ देणे. मग त्यात गूळ, बडीशेप टाकणे. पाणी उकळल्यावर त्या उकळत्या पाण्यात बाजरीचे पीठ हाटून घेणे. एकदम पातळ पेज तयार करून बाळंत बाईला एक महिना सकाळ-संध्याकाळ पिण्यास देणे. यामुळे बाळाचे पोट खराब होत नाही व बाळंतीण बाईला दूध जास्त येते.

**कुसुम गायकवाड, रामवाडी, स्त्रीवाणी**

बाळंतपणात पोटदुखीचा त्रास सहन करावा लागतो. बाळंतीण झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कडुलिंबाचा रस काढून तो तीन दिवस १ चमचा दिल्यास पोटदुखी कमी होते. रोज ताजा पाला आणून रस करावा.

**- मनीषा कुलकर्णी, वडगाव मावळ, दिशा**

# विवाह... स्त्रीच्या आयुष्यातील स्थलांतर

*स्थलांतर म्हणजे काय? तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. स्थलांतर कुठेही असो. ते मानवी मन, भावना, संस्कृती यांवर परिणाम करत असते. स्त्रीच्या आयुष्यातही असेच एक स्थलांतर घडत असते. विवाह या एका संस्कारामुळे तिचे एका घरातून दुसऱ्या घरात स्थलांतर घडत असते. या एका स्थलांतरामुळे तिचे पूर्ण आयुष्य बदलत असते. यामुळे फक्त घरच बदलते असे नाही तर माणसे, संस्कृती, आचारविचार, राहणीमान, चालीरीती सगळेच बदलत असते. सासरी गेल्यावर तिला तिच्या भावना, महत्त्वाकांक्षा, स्वप्ने सारे काही सोडून त्या घरी पाळल्या जाणाऱ्या रूढी, परंपरेचा स्वीकार करावा लागतो. सासरी जातानाच 'दिल्या घरी सुखी रहा' यासारख्या दिल्या जाणाऱ्या उपदेशामुळे काही वेळा तिला न पटणाऱ्या गोष्टी सुध्दा कराव्या लागतात.*

**– सीमा जाधव, खेड , दिशा संस्था**

---

# गाव बदलाची गोष्ट

माझे माहेर पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावचे. सासरे नोकरीच्या निमित्ताने मुळशी तालुक्यात स्थायिक झाले. त्यामुळे मलाही इथेच राहावे लागले. सुरुवातीला मला इथे करमायचे नाही. माझे मिस्टर नोकरीच्या निमित्ताने बाहेरच असायचे. आठवड्यातून ते शनिवारीच घरी यायचे. सासू-सासरे, दीर यांच्या हाताखालीच दिवस काढायला लागले. मला सारखे वाटायचे माझ्या वडिलांनी मला इकडे जंगलात आणून सोडले आहे. त्यावेळी काही सोयी नव्हत्या. फोन नव्हते, पत्र लिहायचे म्हटले तरी मला भीती वाटायची.

त्यावेळी माझ्या माहेरी स्त्रिया पाणी भरत नव्हत्या. पुरुषच कावडीने पाणी भरायचे. मला पाणी आणायची सवय नव्हती. मला हंडा व्यवस्थित डोक्यावर घेता येत नव्हता. एकाच हंड्यानं मी पाणी भरायचे म्हणून बायका मला हसायच्या. मला रडायला यायचे.

माहेरी मी सर्वांची लाडकी होते. इथे सासरी आल्यानंतर माझ्या सगळ्या लाडाचा झाडा झाला. माहेरी मला वर खाण्याची सवय होती अन् इथे जेवणाशिवाय काहीच मिळायचे नाही. मराठीत म्हणच आहे, 'दिली तिथं मेली'.

मी शेवटी आई-वडिलांच्या नावासाठी सासरी दिवस काढले. माझ्या मुलांना शिकवले. स्वतःच्या पायावर उभे केले.

**छाया जगताप, कोळवण**
**साधना व्हिलेज**



सासरी जाणे म्हणजे बाईसाठी कितीतरी गोष्टी बदलतात. अगदी स्वच्छतेच्या सवयीही. याचा खूपदा त्रास होतो. त्याबद्दल अलकाताई म्हणतात...

"माझी सासू सारखी मिश्री लावायची ती मला आवडत नसे. माझी सासू भाकरी जमिनीवर ठेवायची ते मला कधी आवडत नसे. स्वच्छता अजिबात नसायची. मी आल्यापासनं घरात स्वच्छता ठेवायला लागले."

**अलका लोयरे, हाडशी, साधना व्हिलेज**

# हंगामी स्थलांतर

कित्येक वर्षांपासून वाडा-भीमाशंकर वनसंरक्षण आणि अभयारण्य या परिसरातील ठाकर समाजात रोजगारासाठी हंगामी स्थलांतर होते. ठाकर समाजातील लोक वन रोजगारासाठी, उदरनिर्वाहासाठी आणि काहीतर परंपरेसाठी स्थलांतर करतात. ते पाच-सहा महिन्यांनी परत घरी येतात. यामध्ये तरूण वयातील व मध्यम वयातील व्यक्तींचा समावेश असतो. घरी फक्त असतात ती मुलं आणि वृद्ध व्यक्ती. कारण यांचा कामासाठी काहीच उपयोग होत नसतो. ह्या वृध्दांची आणि मुलांची खूप हेळसांड होत असते. अनेकदा अक्षरशः चहा आणि बटर, पाव  यावरच हे लोक दिवस काढत असतात. याशिवाय शाळाबाह्य मुलांचे प्रमाण वाढते, कारण मुलांकडे लक्ष देण्यासाठी घरी कोणीच नसते. तसेच मुलांमध्ये कुपोषण दिसते. मुलांमध्ये व्यसनाधीनता देखील वाढत आहे. काही वेळेस मुले जलद गतीने पैसा मिळवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करतात. वृध्द व्यक्तींना तर दिवस काढणे खडतरच असते. कारण आयुष्यभर शारीरिक कष्ट केल्यामुळे शरीर अक्षरशः झिजून गेलेले असते. त्यात नीट आहार मिळत नाही. त्यामुळे ठाकर समाजातील वृद्धांचे हाल होतात. हंगामी रोजगारासाठी केलेले हे स्थलांतर म्हणजे नाइलाजाला काहीच इलाज नाही यातीलच हा एक भाग.

**सुनिता नाईकरे, कडधे - खेड, दिशा**

---

# रेशनचा प्रश्न

*काही वर्षांपूर्वी सर्वांनाच स्वस्त धान्य दुकानामधून (रेशनवर) धान्य मिळायचे. त्यामुळे सर्वांनाच थोडीफार अन्नसुरक्षा होती. मात्र  गेल्या २० वर्षांत जागतिकी-करणानंतर सरकारचे धोरण बदलले आहे. आता फक्त दारिद्र्य रेषेखालील लोकांनाच रेशनवर धान्य मिळते. त्यासाठीही खूप वणवण करावी लागते.*

परमेश्वराने हे जग बनवताना इतक्या वेगवेगळ्या नमुन्याची विचित्र माणसे तयार केली. त्यातच रेशनिंग दुकानदार म्हणजे अफलातूनच! आता हेच पहा ना ... आम्ही राहतो तेथून रेशनिंग दुकान दोन किलोमीटर लांब अंतरावर आहे. घरच्या रोजच्या कामातून वेळ काढून रेशन आणायला गेलो तर नेमके दुकान बंद. चार-पाच वेळा फेऱ्या मारल्यावर दुकान उघडे सापडणार.

दुकानदाराची साफसफाई आणि पूजा होईपर्यंत बाहेर लाइनीत ताटकळत उभे राहायचे. तासा दोन तासांनी नंबर आल्यावर 'साखर संपली, गहू दोन दिवसांनी येणार आहे फक्त तांदूळ आणि तेल शिल्लक आहे. बोला काय देऊ?' असे दुकानदार सांगतो. बघा आता काय करायचे?

रेशनिंग दुकानात सर्व रेशनिंग एका वेळी मिळणे म्हणजे दिवाळी आणि ती वर्षा सहा महिन्यानं कधी तरीच येते. तो दिवस धूमकेतू सारखा कधीतरीच उगवतो.

**- एक त्रस्त नागरिक, खेड विभाग, दिशा संस्था.**




रॉकेल संपले, साखर संपली मग शिल्लक काय आहे? सडका गहू?

# कष्टासाठी जगण्यासाठी वीतभर पोटासाठी

आम्ही जेव्हा आमच्या मूळ गाव म्हणजेच बीड, उस्मानाबाद, अहमदनगर येथून प्रथम पुण्यात आलो तेव्हा आम्हांला खूप अडचणींना तोंड द्यावे लागले. गावातील वातावरणापेक्षा पुण्यातील वातावरण अगदी वेगळे होते. उंचच उंच इमारती, गाड्यांचा आवाज, धूर, गर्दी, जिकडे तिकडे माणसंच माणसं.

सुरुवातीला तर घरापासूनची समस्या भेडसावू लागली. घर कुठे घ्यावे, कसे घ्यावे ह्या सर्व गोष्टींनी काळजी वाटू लागली. उंच इमारतीत घर घ्यावे तर न परवडणारे भाडे आणि झोपडपट्टीत घ्यावे तर न जमणारे वातावरण. कसेतरी वस्तीत घर मिळवले. त्यानंतर आलेली अडचण म्हणजे भाजीपाला, किराणा. गावाकडच्या भाज्यांपेक्षा या भाज्या बघूनच नको वाटायचे. गावाकडे कशी ताजी ताजी हिरवीगार भाजी, शेतातून घरी येता-येता उपटून आणायची. पण पुण्यातील भाजी घेण्याशिवाय पर्याय नव्हता. नंतर प्रश्न आला तो शाळेचा, शाळा सरकारी की खासगी? मुलांच्या शाळेबद्दलची समस्या कशीबशी सोडवली.




गावात असताना वाटायचं इथं कितीही कष्ट केले तरी आहे त्याच ठिकाणी. रोज तीच कामे, जिवाला काहीच सुख नाही. जिवाला थोडाही विसावा नाही!

इथे आल्यावर खेडेगावातील जीवनपेक्षा शहरी जीवन सुखी वाटू लागले. कारण ना शेती, ना ते कष्ट. फक्त मजाच. पण अशी किती दिवस मज्जा चालेल? महिना भरला तर भाडे आले. लाइट बिल आले. मग मात्र खूप अडचणी जाणवू लागल्या. विचार केला एक आणि झाले मात्र दुसरेच. मग आपणही कामाला जाऊ असे ठरवले. परंतु ना भरपूर शिक्षण, ना कुठली माहिती. मुलांच्याकडे व त्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करून मोठ्या इमारतीत स्वयंपाक, साफसफाई अशा कामाला जाऊ लागलो. कामाच्या ठिकाणीही कष्टच कष्ट. पण पर्याय नाही. मग मात्र वाटे आपण आपल्या गावीच पाहिजे होतो. उगाच या शहरातील लखलखाटाला आपण फसलो. पण आता विचार करून फायदा नाही. कारण वेळ निघून गेलेली आहे. मुलांना आणि आपल्याला शहरी वातावरणाची व सर्वच गोष्टींची जणू सवय लागून गेली आहे. त्याशिवाय जगणे जणू कठीण आहे. परंतु दर वर्षी यात्रेला जाण्याची व उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी जाण्याची ओढ मात्र मनात आहे. कामावर सुट्ट्या नसतानाही किंवा त्या कामाची पर्वा न करता आम्ही गावी जातो. गावाहून परत शहरात येऊन सर्व गोष्टींना तोंड देण्यास समर्थ उभे राहतो.

**गटचर्चेवर आधारीत लेख. संकलन- स्त्रीवाणी टीम**

## ओळखा पाहू ?

१) पाहुणा आला गडबड झाली
झिपरी कार्टी कुठं गेली?

२) अंथरूण केलं पांघरूण केलं
ढमालं कार्ट कुठं गेलं?

**- शाहुबाई कांबळे, नांदगाव, साधना व्हिलेज**

उत्तर पान ११वर

# आहे कार्यकर्ती तरीही...

मला पहिली मुलगी झाली. माझ्या मिस्टरांना खूप आनंद झाला. एक दोन किलो नुसती मिठाई, पेढे वाटले. खूप छान वाटलं. नंतर मला मुलगा झाला. दोघांचेही लाड सारखेच व्हायचे.

मुलीचं लहानपण कसं गेलं ते कळलं नाही. सातवी वर्गात आल्यानंतर थोडी मोठी दिसायला लागली. मग मात्र माझ्या डोक्यात यायचं कशाला एवढ्या लवकर मोठी दिसायला लागली. तिला पाहून मैत्रिणी विचारू लागल्या 'कोणत्या वर्गात आहे? किती वर्षाची झाली?' या प्रश्नाचं उत्तर खरं द्यावं की खोटं कळत नव्हतं. पण नंतर कळणारच होतं. तिच्या बरोबरच्या काही मुलींची पाळी चालू झाली. तेव्हा मात्र सारखं वाटायचं माझ्या मुलीलापण येईल का आत्ता? वाटे दहावीत गेल्यावर आली तर बरं होईल. तेव्हा तिला सगळं समजेल.

मी मैत्रिणींच्या किंवा एरियामधील १२-१३ वयातील मुलींना मासिकपाळी बाबत खूप छान माहिती देत असे. मुली मोकळ्यापणे मला प्रश्न विचारीत असत. अगदी घरातील तिच्या चुलत बहिणींनाही माहिती दिली. पण माझ्या मुलीला कसं सांगू हा प्रश्न नेहमी पडत असे. ज्या दिवशी तिचे खूप पोट दुखत असे तेव्हा तिला मी शाळेत जाऊ नको म्हणायची. ती खूप भांडायची पण मला तिला काही सांगता येत नव्हते. शेवटी एक दिवस तिची मासिकपाळी चालू झाली. मी तिला सर्व माहिती दिली. मला खूप रडावंसं वाटलं पण आनंदही झाला. पाळी लवकर आल्यामुळे वाईटही वाटलं. तिच्या वडिलांना सांगितल्यावर आम्हा दोघांचे डोळे व मन भरून आलं. मी तिला पाळीमधे काही वेगळं झालं असं वाटू देत नाही. वेगळं बसवत नाही. पण, "आई असं का ग होतं" या तिच्या प्रश्नाचं उत्तर द्यायला मला दोन-तीन महिने गेले.

**वंदना पवार, वारजे माळवडी , एफ पी ए आय**

---

# माझी चिमणी

मला मुली खूप आवडतात. मी माझ्या मुलींवर खूप प्रेम करते. मला तीन मुली व एक मुलगा आहे. मी त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकून घेते व त्यांना चांगले काय नि वाईट काय हे पटवून देते. माझी आई कामाला जात असल्याने ती माझ्याशी कधीच वेळ काढून गप्पागोष्टी करत नव्हती. मला त्या गोष्टींची कमतरता वाटायची. आता मी माझ्या चिमण्यांमध्ये त्या गोष्टी पूर्ण करते. याचा खूप आनंद होतो.

माझी मोठी मुलगी सातवीत गेली. मग आपली जबाबदारी वाढली असे मनात वाटत होते. माझ्या चिमणीमध्ये काही बदल दिसू लागले होते. ती टापटीप राहायला लागली. तेव्हापासून मला चिंता वाटू लागली होती, पण मी दाखवली नाही. तेव्हा मी मातेची मैत्रीण झाले. तिच्याशी संवाद साधू लागले.

एकदा मुलगी मला म्हणाली 'आई मी आठवीला नाही जाणार'. तिला शाळेमध्ये *वयात येताना होणारे बदल* हा पिक्चर दाखवला होता त्यामुळे ती घाबरली. घरी येऊन खूप रडू लागली. मी तिला समजावू लागले की प्रत्येक स्त्रीला हे खूप आवश्यक आहे. त्यामुळे तिला या समाजात महत्त्वाचे स्थान दिले जाते. तिची समजूत पटली. पण माझे सर्व लक्ष तिच्याकडे असायचे. मी घाबरले तर नव्हते. तिच्या आहाराची काळजी मी घेई. शाळेमध्ये सुध्दा तिला काय अडचण येऊ नये यासाठी मी तिच्या सोबत शाळेत जाई. ती वयात आली तर बाहेर जायचे नाही, कोणाशी बोलायचे नाही... इत्यादी बंधने घातली नाही.

**शोभा उघाडे, चिखलवाडी, एफ पी ए आय**

## सवयी बदलता येतात

*गावात-शहरात स्त्रियांमध्ये मिश्री लावण्याचे प्रमाण मोठे आहे. मिश्रीच्या धुंदीत कामे होतात व भूकही लागत नाही असं बायका म्हणतात. मात्र ही सवय आरोग्याला घातक आहे. आपण मनानं ठरवलं तर ही सवय सोडू शकतो हेच खालील अनुभवातून कळते.*

माझं लग्न १५ व्या वर्षी(१९८६) झालं. सासर तासगाव ढवळीला. लग्नानंतर नवरा कधी नीट नांदला नाही. त्याला सगळीच व्यसनं होती. तो गावी फार कमी यायचा. आल्यावरही मला मारायचा. घरी भांडायचा, पैसे द्यायचा नाही. मला १५ वर्षानं मुलगा झाला.

मिश्रीची सवय मला लग्नानंतर लागली. कारण एकटीला करमायचं नाही. मुलं- नवरा असलं तर टाइम निघून जातो, पण काही नसलं तर तलफ म्हणून याची सवय लागली. मिश्री हाच विरंगुळा. दिवसात ५ ते ६ वेळा मिश्री लावायची. मग सवयच लागली. पुढं नवरा घरी येईना नि पैसा देत नव्हता. मग माझी जबाबदारी नको म्हणून मला घरातून घालवण्यासाठी सासरच्यांनी तेल-पाणी नि पुढे मिश्रीही देणं बंद केलं.

पहिल्यांदा तलफ आली की मी मिश्री चोरून घ्यायची. मात्र जाणवलं की यानं काय होणार? मग ठरवलं मिश्री वापरायचीच नाही. पण ते सोपं नव्हतं. मी हळू हळू मिश्री कमी केली. तलफ आली की राखुंडी वापरायला सुरुवात केली. मनानं पक्कं ठरवलं. पुढे सहा महिन्यात मिश्री पूर्ण बंद झाली.

आता साधना व्हिलेजमध्ये काम करणाऱ्या बायकांनी मिश्री सोडावी म्हणून मी प्रयत्न करते. मिश्रीची तलफ आली तर बिस्कीट खा, लिमलेटची गोळी खा असं सांगते. ती वेळ गेली की तलफ जाते. आता काही जणी प्रयत्न करीत आहेत.

**मंगल पाटील, साधना व्हिलेज.**

## मी अनुभवलेला एक प्रसंग

माझ्या जीवनात मी खूप चांगली-वाईट माणसे पाहिली. त्यातच मला अनुभवाला आलेला एक प्रसंग मी तुमच्या पुढे मांडत आहे. तो एका माणुसकी नसलेल्या कुटुंबाचा आहे.

मी माझ्या डिलेव्हरीला गेले असताना दवाखान्यात मला अनुभवाला आलेला. मी आणि माझ्या समोर एक स्त्री आमच्या दोघींची एकाच वेळेस डिलेव्हरी झाली. मला मुलगा तर तिला मुलगी पण ती खूप रडत होती. मला काहीच कळत नव्हतं की ही का रडतेय? मग थोड्या वेळाने मला कळलं की तिचे सासरकडचे लोक म्हणजे तिची सासू, नवरा तिला मुलगी झाली म्हणून न सांगता निघून गेले. कारण तिला आधीच्या दोन मुली आणि अजून ही तिसरी मुलगी. ती खूप रडत होती. तिचे रडणे पाहून आजूबाजूचे सर्व समजावत होते. शेवटी तिच्या माहेरहून तिची आई तिला बघायला आली. तिने बिल भरले व तिला तिच्या मुली सोबत घरी घेऊन गेली. मला तो प्रसंग बघून खूप आश्चर्य वाटलं. जगात अशीही माणसं आहेत? मुलगी ही काय शाप वाटली? त्या निरागस जिवाचा व तिच्या आईचा काय अपराध होता. नंतर मी घरी आले पण तो प्रसंग माझ्या डोळ्यासमोरून जात नव्हता. ती नाजूक, गोंडस मुलगी डोळ्यासमोर येत होती. क्षणात मनात विचार आला, मला दिली असती ती मुलगी? पण काही गोष्टी आपल्या हातात नसतात. मात्र मुले ही देवा घरची फुले असतात. मग मुलगा असो वा मुलगी.

**जयश्री सागर, वडगाव मावळ, दिशा**



कोड्याचे उत्तर
१) केरसुणी २) उशी

## मी आणि माझी आई

मी छाया अर्जुन मगर. वय २९ वर्षे. मी सर्वांत मोठी, माझ्या मागे पाच बहिणी आणि आमची बेताची परिस्थिती. त्यातूनच माझं जीवन घडलं. माझ्या आईला समाजात मुलींची आई असल्यामुळे मान द्यायचे नाही. मला पाच नंबरची बहीण झाली तेव्हा मी सातवीत होते. तेव्हा बाळंतपण मी केलं. सहा नंबरची बहीण जन्माला आली तेव्हा मी ११वी मध्ये होते. मी कॉलेजला जाऊ शकले नाही. मला कॉलेजमध्ये प्राध्यापक, मॅडम ओरडून विचारत पण मी काहीच सांगू शकत नव्हते.

पुन्हा मुलगी झाल्यानं वडिलांनी मानसिक ताण घेतला आणि काम करणं बंद केलं. त्यामुळे आमचे खाणं-पिणं खूपच जड झालं. मला लहान वयात आई वडिलांकडे मोठ्या व्यक्तीसारखं लक्ष द्यावं लागलं. उधारी करून रेशन आणणं, स्वयपांक करून दोघांची काळजी घेणं, छोट्या बहिणीला सांभाळणं.

आईच्या ऑपरेशनला आजी, चुलते तयार नव्हते. त्यांना घरात वंशाला दिवा हवा होता. १२वी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मी खूप धाडसानं सरकारी दवाखान्यात आईचं ऑपरेशन केलं. लहान वयापासून परिस्थितीशी सामना केल्यामुळे मी मला एकच मुलगा ठेवला. आता तो नऊ वर्षाचा झाला.

माझी आई एकही इयत्ता शिकली नाही. पूर्ण अशिक्षित परंतु तिने आम्हांला शिकवलं. आम्ही चारही बहिणी सध्या नोकरी करतो. लहान दोघी बहिणी शिक्षण घेत आहेत. मला माझ्या आईचा खूपच अभिमान आहे. कारण शून्यातून तिनं मुलींना जोपासलं. आम्हाला स्वत:च्या पायावर उभं केलं.

**छाया मगर, रामनगर, एफ पी ए आय**

---

## वाचक म्हणतात


गीता पेरणेकर, साधना व्हिलेज

चुलीपल्याड...स्त्रियांसाठी मुक्त व्यासपीठ
चुलीपल्याड ही खूपच सुंदर संकल्पना आहे. स्त्रियांच्या बाबतीत म्हणाल तर जे विचार फक्त डोक्यात चालायचे ते प्रत्यक्षात उतरवण्याची संधी सामान्य महिलांना मिळाली आहे. मी तर म्हणेन की या मिळालेल्या संधीचं प्रत्येकाने सोनं करावं.

**स्नेहल गुरव, दिशा**

*चुलीपल्याडच्या संपादक मंडळातील सर्व प्रतिनिधींना संपादन व मांडणीबाबत प्रशिक्षणही देण्यात आले. याचा वापर करून साधना व्हिलेजच्या उमेश भाग्यवंतने गावात मुलांच्या साह्याने बालमेळाव्यामध्ये 'इंद्रधनू' अंकाची निर्मिती केली. चुलीपल्याडच्या निमित्ताने इतर संस्थाही लिखाणाचा व अंकनिर्मितीचा वसा पुढे चालवत आहेत ही फार समाधानाची बाब आहे.*

चुलीपल्याडचा अंक वाचला. त्यातील बिनमोलाचे श्रम हा विषय खूप आवडला. लेख वाचून त्यावर विचार करावा असे वाटले. आमच्या सारख्या स्त्रियांना आम्ही काही लिहिले तर ते छापून येईल असा एक पेपर मिळाला.

**सीमा भालेकर, दिशा**

एफ पी ए आय संस्थेमध्ये ३२ गटांमध्ये बिन मोलाचे श्रम व पाणी आणि स्त्रिया या विषयांवरील लेख वाचले. पाण्यावरचा लेख वाचून इतर वस्त्यांमध्ये स्त्रियांना होणाऱ्या त्रासाबद्दल कळले. आता पाण्याची नासधूस करणार नाही अशी प्रतिक्रिया आली. बिन मोलाचे श्रम हा लेख वाचून एक ताई म्हणतात, 'घाण्याला जुंपलेला बैल जसा पोटावारी राबतो तसंच बाईच असतं.'